# माऊली अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची इंदौर येथील नामांकित कंपनीमध्ये निवड



निवड झालेले विद्यार्थी सोबत प्राध्यापकवृंद

*तालुका प्रतिनिधी/४ नोव्हेंबर*

**शेगाव :** येथील स्थानिक माउली अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची इंदौर येथील नामांकित कंपनीमध्ये निवड झाली असून संपूर्ण महाविद्यालयीन परिसरात त्यांचे याबद्दल कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी निरनिराळे उपक्रम राबविण्यात माऊली अभियांत्रिकी महाविद्यालय अग्रेसर आहे. नुकतेच या महाविद्यालयाला NAAC या राष्ट्रीय मुल्यांकन परिषदेतर्फे 'A' दर्जा प्राप्त झाला आहे. शैक्षणिक विकासा सोबतच विद्यार्थ्यांच्या उदयमशीलतेच्या विकासाकडे सुद्धा महाविद्यालय कटाक्षाने लक्ष देत असते. याकरिता महाविद्यालयातील ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग अविरत प्रयत्नशिल असते. त्यांच्या प्रयत्नाना फलस्वरूप मागील वर्षात महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ७२ टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवी परीक्षेपूर्वीच नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी मिळाली.

या वर्षी सुद्धा शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला इंदौर येथील नामांकित कंपनी Shield Research Pvt.Ltd.,Indoreने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी महाविद्यालयाला भेट दिली होती. त्यांनी विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा व मुलाखती घेतल्या. या मध्ये संगणक शास्त्र - १२, अणुविद्युत व दूरसंचार ०७, विद्युत -०८ व यांत्रिकी चे ०५ अशी शाखानिहाय विद्यार्थ्यांची निवड झाली. संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वरजी दादा पाटील, यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून संबधित प्राध्यापकांचे सुद्धा कौतुक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी. एम. जाधव सर यांनी T & P cell च्या प्रमुख श्री. तुषार बढे व तसेच संबधित प्राध्यापक वृंदातर्फे केल्या गेलेल्या परिश्रमाचे कौतुक करून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना यांच्या भावी वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. या निवड प्रक्रियेत प्रा. सागर देशमुख, प्रा. मंजुषा पाटील, प्रा. स्वप्नील भडंग, प्रा. पियुष डोरले यांनी मोलाची भूमिका पार पाडली.